सबसे ‘तेज’ ग्लोबल महातेज...!

# ग्लोबल महातेज

१ स्वागत मूल्य रु.

https://epaper.globalmahatej.com/

वर्ष १ ले | अंक : १९ | रविवार, दि. १२ ऑक्टोबर २०२५ | पाने : ४ | अमळनेर | किंमत : १ रु. | Email - globalmahatej@gmail.com

## दिनविशेष

१२ ऑक्टोबर

- भारतात ब्रिटीश सरकारने क्रिमिनल ट्राइब्स अ‍ॅक्ट या कायद्याद्वारे १६१ जाती व जमातींना गुन्हेगारी जमाती ठरविले.
- राष्ट्रीय मानवाधिकार आयोगाची स्थापना.
- ३३ व्या बुद्धीबळ ऑलिम्पियाडमध्ये कोल्हापूरच्या पल्लवी शाहने आपला सामना जिंकून आंतरराष्ट्रीय महिला मास्टरचा किताब पटकावला.

## गर्व से कहो स्वदेशी है हम...! स्वदेशी ही खरिदेंगे हम...!!

**स्वातंत्र्यपूर्व संग्रामातील स्वदेशीची हाक आता पुन्हा देवू या. नवरात्रोत्सवात आपण आदिमाया आदिशक्तीचा जागर करतो त्याप्रमाणेच स्वदेशीचाही जागर करूया..! सच्च्या भारतीयांवर जेव्हा–जेव्हा परकीय आक्रमण होते तेंव्हा–तेंव्हा ते प्रचंड त्वेषाने पेटून उठतात...!! आता तीच वेळ येऊन ठेपली आहे...!!! जय भारत...! जय स्वदेशी...!!**

# गुणवत्तापूर्ण शिक्षण अन् संस्कार हेच यशाचे गमक

## पालकमंत्री गुलाबराव पाटील : अमळनेरला खा. शि. मंडळाच्या विविध विकासकामांचे उद्घाटन

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर ही महाराष्ट्राचे मातृपीठ आणि पूज्य साने गुरुजी यांच्या विचारांनी प्रेरित, दानशूर प्रताप शेठजी यांच्या पदस्पर्शाने पावन झालेली भूमी आहे. श्री संत सखाराम महाराज व श्री मंगळग्रह मंदिर असलेल्या मंगल नगरीत हा कार्यक्रम होत आहे, ही खरोखरच अभिमानास्पद बाब आहे. १९४५ मध्ये लावलेल्या प्रताप महाविद्यालयाच्या या छोट्याशा रोपट्याचे आज वटवृक्षात रूपांतर झाले आहे. गुणवत्तापूर्ण शिक्षण आणि संस्कार हेच खरे खानदेश शिक्षण मंडळाच्या यशाचे गमक आहे, असे गौरवोद्गार जिल्ह्याचे पालकमंत्री तथा पाणीपुरवठा मंत्री ना. गुलाबराव पाटील यांनी आज येथे काढले.

येथील खानदेश शिक्षण मंडळाच्या विविध विकासकामांचे शनिवार, दि. ११ रोजी सकाळी दहाला उद्घाटन झाले, त्यावेळी अध्यक्षस्थानावरून ते बोलत होते. जलसंपदा मंत्री ना. गिरीश महाजन, वस्त्रोद्योग मंत्री ना. संजय सावकारे, खासदार स्मितताई वाघ, माजी मंत्री तथा आमदार अनिलदादा पाटील, धुळे शहराचे आमदार अनुप अग्रवाल, पारोळा– एरंडोल मतदारसंघाचे आमदार अमोल पाटील, आमदार सत्यजीत तांबे, माजी आमदार डॉ. बी. एस. पाटील, माजी आमदार कृषिभूषण साहेबरावदादा पाटील, माजी आमदार शिरीषदादा चौधरी, खानदेश शिक्षण मंडळाचे अध्यक्ष जितेंद्र झाबक, उपाध्यक्ष जितेंद्र देशमुख, उपाध्यक्षा सौ. माधुरी पाटील व सौ. वसुंधरा लांडगे, कार्याध्यक्ष डॉ. संदेश गुजराथी व सर्व संचालक मंडळातील पदाधिकारी व्यासपीठावर होते.

पालकमंत्री पाटील म्हणाले, की शिक्षणाची उंच भरारी ही फक्त इमारतींनी होत नाही. त्या इमारतींमध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांवर संस्कारांची शिदोरी शिजविली जाते. या संस्थेचे संचालक मंडळ अत्यंत दूरदृष्टी असलेले आणि कुशल आहे. आज राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांची पुण्यतिथी आहे. संत ज्या ठिकाणी वास करतात तेथे प्रगती निश्चित असते. संस्थाचालकांनी एखादा गरीब विद्यार्थी संस्थेत आला, तर त्याची फी थोडी कमी करावी. कारण शिक्षण संस्था ही सेवा आहे.

दरम्यान, खानदेश शिक्षण मंडळ संचलित विविध शाखांपैकी श्री. प्रा. र. का. केले कॉलेज ऑफ फार्मसी, इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट अ‍ॅण्ड टेक्नॉलॉजी, प्रताप महाविद्यालय (स्वायत्त) व पी. बी. ए. इंग्लिश मिडियम स्कूलचे उद्घाटन पालकमंत्री गुलाबराव पाटील, श्री. प्रा. र. का. केले कॉलेज ऑफ बी. फार्मसीच्या विस्तारीत इमारतीचे उद्घाटन जलसंपदा मंत्री गिरीश महाजन, इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट अ‍ॅण्ड टेक्नॉलॉजी नूतन अत्याधुनिक संगणक लॅबचे उद्घाटन वस्त्रोद्योग मंत्री संजय सावकारे, प्रताप महाविद्यालयातील नवीन सुसज्ज सेमिनार हॉलचे उद्घाटन खासदार स्मितताई वाघ व पी. बी. ए. इंग्लिश मीडियम स्कूलच्या संगणक लॅबचे व्हर्च्युअल उद्घाटन आमदार अनिलदादा पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी संस्थेचे पदाधिकारी, प्राध्यापक, प्राध्यापकेतर कर्मचारी, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

फार्मसी कॉलेजचे चेअरमन योगेश मुंदडे यांनी प्रास्ताविकात खानदेश शिक्षण मंडळाच्या आजवरच्या वाटचालीचे सविस्तर विवेचन केले. यामध्ये संस्था पातळीवर सुरू असलेले विविध उपक्रम, भविष्यात करावयाच्या विकासात्मक बाबींचा थोडक्यात ऊहापोह केला.





## वावडे येथून अल्पवयीन मुलगी बेपत्ता

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर तालुक्यातील वावडे येथून एक १७ वर्षीय अल्पवयीन मुलगी बेपत्ता झाली आहे. शेतीच्या कामासाठी मध्य प्रदेशातून वावडे येथे आलेल्या कुटुंबातील ही मुलगी आहे. गुरुवार, दि. ९ ऑक्टोबरला पहाटेपासून ती बेपत्ता झाली आहे. परिसरात शोध घेतल्यानंतरही तिचा पत्ता लागला नाही. तिला फूस लावून पळवून नेल्याचा संशय तिच्या कुटुंबीयांनी व्यक्त केला आहे. या प्रकरणी तिच्या आईने दिलेल्या तक्रारीनुसार मारवड पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हवालदार सुनील पाटील तपास करीत आहेत.

### ‘ प्रताप ’च्या विद्यार्थ्यांचे भविष्य उज्ज्वल : मंत्री गिरीश महाजन



प्रताप शेठजींनी स्थापन केलेले प्रताप महाविद्यालय शैक्षणिक क्षेत्रातील वेगळे आकर्षण आहे. अंगणातील लहान वृक्ष आता वटवृक्ष बनला आहे. इमारती भव्य होत आहेत. खरी ताकद ही विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेत आहे. ग्रामीण भागातील दर्जेदार शिक्षण मिळावे, तंत्रज्ञान आणि कौशल्यातून त्यांना भविष्यात सक्षम बनवावे, हा संस्थेचा उद्देश आहे. शेतकरी आणि मजुरांच्या मुलांना दर्जेदार शिक्षण मिळावे, यासाठी संचालक मंडळ प्रयत्नशील आहे. पंतप्रधानांच्या योजनांचा फायदा घेऊन, डिजिटल इंडिया, कौशल्य विकास आणि प्रधानमंत्री युवक रोजगार योजनांचा लाभ घेऊन विद्यार्थ्यांनी स्वतःच्या पायावर उभे राहावे. जिद्द, मेहनत हीच यशाची खरी गुरुकिल्ली आहे. प्रताप महाविद्यालयात शिकणाऱ्या विद्यार्थ्यांचे भविष्य उज्ज्वल आहे.

### शिक्षण आणि तंत्रज्ञानाचा संगम : मंत्री संजय सावकारे



खानदेश शिक्षण मंडळाचे प्रताप महाविद्यालय संपूर्ण खानदेशात उत्कृष्ट शिक्षण संस्थांमध्ये प्रसिद्ध आहे. अशा महान कार्यक्रमात आज मला सहभागी होण्याचा आणि प्रताप कॉलेजला भेट देण्याचा मान मिळाला, हे माझे भाग्यच आहे. अनेक अधिकारी आहेत,की ज्यांनी प्रताप महाविद्यालयातून शिक्षण घेतले आहे. आधुनिक इमारती, संगणक लॅब, कॉन्फरन्स रूम आणि विद्यार्थ्यांसाठी सर्व सुख–सुविधा उपलब्ध आहेत. पूर्वी पुणे किंवा मुंबईसारख्या शहरात जावे लागत होते. मात्र आता येथेच अत्याधुनिक कोर्सेस उपलब्ध झाले आहेत. व्यक्तीच्या कुंडलीत जर मंगळ असेल, तर त्याची विशेष शांती करावी लागते. तुमच्या गावाची शांती करण्यासाठी श्री मंगळग्रह देव स्वतः येथे येऊन बसले आहेत. त्यामुळे काही संकट आले, तर श्री मंगळग्रह भगवान आहेतच.

### प्रताप महाविद्यालय अभिमानाचा ठेवा : खासदार स्मितताई वाघ



प्रताप महाविद्यालयाचे वैभव फार जुने आहे. याच शिक्षण संस्थेत माझ्या आजोबांनी शिक्षण घेतले आहे. त्यांना भेटलेले अनुभव आणि आठवणी आजही मी जशाच्या तशा जीवंत ठेवल्या आहेत. या गोष्टीचा मला नेहमीच सार्थ अभिमान वाटतो. प्रताप महाविद्यालयात शिकून गेलेल्या विद्यार्थ्यांनी समाजात आणि विविध क्षेत्रांत उच्च पदे प्राप्त केली आहेत. असे एकही क्षेत्र नाही, की विद्यार्थ्यांनी चमक दाखविलेली नसावी. संस्था चालविणे इतके सोपे नाही. मात्र, खानदेश शिक्षण मंडळाने सदैव उत्कृष्ट कार्य केले आहे. काळानुसार संस्थेने विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण देण्याचा प्रयत्न सुरू ठेवला आहे. त्याचाच भाग म्हणून आज विविध विद्याशाखांच्या इमारतींचे भव्य स्वरूपात उद्घाटन झाले आहे, ही अतिशय गौरवाची बाब आहे.

### ‘एआय’द्वारे जगाच्या नकाशावर नाव कोरा : आमदार अनिलदादा पाटील



एकेकाळी शिक्षणाची पंढरी म्हणून ओळखले जाणारे अमळनेर काही काळ मागे पडले होते. मात्र, आता खानदेश शिक्षण मंडळाच्या संचालक मंडळाच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांमुळे या शहराने पुन्हा शिक्षण क्षेत्रात झेप घेतली आहे. आर्थिक अडचणींमुळे अनेक विद्यार्थी मागे राहायचे. मात्र, आज खानदेश शिक्षण मंडळाच्या माध्यमातून हीच सोय आपल्या तालुक्यात उपलब्ध झाली आहे. त्यामुळे आता कोणाकडेही विनंती करायला जावे लागणार नाही. शिक्षण क्षेत्रात राजकारण नको. संचालक मंडळाने विद्यार्थ्यांचा आणि शिक्षकांचा विचार करून संस्थेचे काम प्रामाणिकपणे करावे. विद्यार्थ्यांनी ‘एआय’सारख्या नवतंत्रज्ञानाचा वापर करून संस्थेसह अमळनेरचे नाव जगाच्या नकाशावर कोरावे.

## कवठळ जि. प. शाळेतील शिक्षक सुरेश सोनवणे निलंबित

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

धरणगाव तालुक्यातील कवठळ येथील जिल्हा परिषद शाळेतील शिक्षक सुरेश चंद्रा सोनवणे हे शाळेत वारंवार गैरहजर राहत होते. ते शाळेत मद्यपान करून येत असल्या बाबतच्याही सातत्याने गंभीर तक्रारी होत होत्या. ही बाब जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मीनल करणवाल यांना कळताच त्यांनी गटविकास अधिकाऱ्यांना श्री. सोनवणे यांना तत्काळ निलंबित करण्याचे आदेश दिले. त्याप्रमाणे गटविकास अधिकाऱ्यांनी शुक्रवार, दि. १० ऑक्टोबर रोजी सुरेश सोनवणे यांना निलंबित केले आहे.

याबाबत घडले असे, की सोमवार, दि. ६ ऑक्टोबर रोजी कवठळ येथील जिल्हा परिषद शाळा बंद असल्याचे ग्रामस्थांच्या निदर्शनास आले. शाळेला कुलूप असल्याची माहिती संतप्त ग्रामस्थांनी गटशिक्षण अधिकाऱ्यांना कळविली. त्यानंतर शाळेची तत्काळ चौकशी सुरू करण्यात आली. केंद्र प्रमुखांनी श्री. सोनवणे यांना नोटीस बजावली होती. ते

पान ३ वर



खरे तर गुरुकुल काळापासून शिक्षकांना गुरुदेव म्हटले जाते. समाजजीवनात ज्यांना आदर्श मानावे असे अनेक बुरुज कोसळत असताना आदर्शवादाचा, नीतिमत्तेचा व सिद्धांतांचा किल्ला गुरुजनांनी अभेद्य राखणे अपेक्षित आहे. या किल्ल्याला साधे खिंडार जरी पडले, तरी समाजजीवनाचे मोठे नुकसान होईल. कर्तव्याचा भाग व शासकीय सेवा प्रक्रियेतील न टाळता येण्यासारखे कर्तव्य म्हणून श्री. सोनवणे यांना निलंबित करावे लागले आहे.

**मीनल करणवाल**
**मुख्य कार्यकारी अधिकारी, जि. प., जळगाव.**









# ठंड का मौसम आते ही क्यों गायब हो जाते हैं सांप? जानिए सांपों की सर्दियों वाली आदतें

## ग्राहक वारंवार मोबाईल फोन का बदलत आहेत?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

'अरे यार! हा फोन दीड वर्षांपूर्वीच विकत घेतला होता. पण आता हँग होतोय'. 'गॅलरीत भरपूर फोटो आहेत. स्टोरेजचा प्रॉब्लेम होतोय'. 'माहीत नाही, काय करू? रिपेअर करू की काय'? 'बॅटरीचा प्रॉब्लेम आहे. नवीन फोनच घेऊया'. 'मग या जुन्याचे काय करू'? 'घरी आजीला देऊन टाक किंवा एक्सचेंज कर. नवीन फोन स्वस्त पडेल'. दिल्लीच्या मेट्रो स्टेशनवर महाविद्यालयीन विद्यार्थ्यांमधील हा संवाद भारतातील मोबाईल फोन बाजारपेठेची झलक दाखवितो. मात्र ही परिस्थिती नेहमी अशी नव्हती.

३१ जुलै १९९५ रोजी भारतात पहिल्यांदा मोबाईल फोनची रिंग वाजली. तत्कालीन कम्युनिकेशन मंत्री सुखराम आणि पश्चिम बंगालचे मुख्यमंत्री ज्योती बसू यांच्यात पहिला कॉल झाला. तेव्हापासून मोबाईल फोनचा वापर प्रचंड वाढला. आज ८५.५% भारतीय कुटुंबांकडे किमान एक स्मार्टफोन आहे. आता मोबाईल फोन फक्त कॉलसाठी नव्हे तर बँक, कॅमेरा, गेमिंग कन्सोल, व्हिडिओ कॉलर, क्लासरूम आणि टीव्ही बनलाय. भारत जगात मोबाईल फोन उत्पादनात दुसऱ्या क्रमांकावर आहे.

**मोबाईल फोन स्वस्त झालेत का?**

ग्राहक वारंवार फोन का बदलतात ? फोन स्वस्त झाले. ईएमआयमुळे खरेदी सोपी झाली, की फोन कमी टिकतात? सॉफ्टवेअर आणि हार्डवेअरमधील बदलांमुळे नवीन फोन घेणे गरजेचे झाले का? की ग्राहकांचा दृष्टिकोन बदललाय? तज्ज्ञांच्या मते, ग्राहकांच्या वर्तनात बदल झाला. पूर्वी टीव्ही पिढ्यान्‌पिढ्या चालायचा. मात्र आता एकाच पिढीत अनेक टीव्ही बदलले जातात. लोकांना अपडेट राहायचे आहे. त्यांच्याकडे खर्च करण्याची क्षमताही आहे.

**फोन वारंवार बदलण्याची कारणे**

सेल्युलर तंत्रज्ञानात बदल (3G, 4G, 5G, आणि भविष्यात 6G) हे एक मोठे कारण आहे. याशिवाय फोन हँग होणे, बॅटरीच्या समस्या किंवा धीमा होणे यामुळेही लोक नवीन फोन घेतात. पूर्वी फीचर फोनवर दिवसातून दोन तास वापर व्हायचा. आता सरासरी ६-७ तास फोन वापरला जातो. यामुळे फोनवर ताण वाढला. त्यामुळे अपाय होण्याची शक्यताही वाढली. स्मार्टफोन सतत वापरले जातात, खाली पडतात. त्यामुळे डॅमेज होण्याचा धोका आहे. २०१७ मध्ये स्मार्टफोन बाजारपेठ शिखरावर होती, तेव्हा १.४-१.५ अब्ज फोन विकले गेले. आता ती १.२ अब्ज डॉलरवर स्थिरावली आहे. याचा अर्थ लोक आता फोन जास्त काळ वापरतात.

**दुरुस्ती इतकी महागडी का?**

फोन दुरुस्तीचा खर्च इतका जास्त आहे, की अनेकदा ग्राहक नवीन फोन घेणे पसंत करतात. स्क्रीन तुटल्यास दुरुस्तीला नवीन फोनच्या निम्मी किंमत लागते. भारतात स्वस्त दुरुस्ती करणारी दुकाने आहेत. मात्र प्रीमियम फोन वापरणारे ग्राहक कंपनीच्या स्टोअरलाच पसंती देतात. सेमीकंडक्टर आणि OLED स्क्रीनमुळे सुट्या भागांचा खर्च वाढला आहे. युनिबॉडी डिझाईनमुळे दुरुस्ती अवघड झाली आहे.

**सेकंड-हँड फोन बाजारपेठेची वाढ**

लोक लवकर फोन बदलतात. याचा अर्थ फोन कमी टिकतात, असा नाही. सेकंड-हँड फोनची बाजारपेठ वाढत आहे. लोक जुने फोन विकतात, एक्सचेंज करतात किंवा घरात कुणाला देतात. यामुळे फोनचे आयुष्य वाढते. 5G नंतर भारतातील सेकंड-हँड फोन बाजारपेठ झपाट्याने वाढली. २०२४ मध्ये ती १०% वाढून ५७ लाख फोन विकले गेले. भारत या बाजारपेठेत जगात तिसऱ्या क्रमांकावर आहे.

**तंत्रज्ञानात बदल किती?**

कॅमेरा, डिस्प्ले, AI फीचर्स आणि बॅटरीत गेल्या काही वर्षांत बदल झाले. दरवर्षी लाँच होणाऱ्या फोनमध्ये फार मोठे बदल होत नाहीत. बटणापासून टच स्क्रीनपर्यंतचा बदल हा सर्वांत मोठा होता. मात्र आता तंत्रज्ञान स्थिरावले आहे. ग्रकाउंटरपॉइंटच्या अभ्यासानुसार, ७९% ग्राहकांना फोनचा टिकाऊपणा महत्त्वाचा वाटतो. ओव्हरहीटिंग (४१%), बॅटरी ड्रेन (३२%), आणि अपघाती नुकसान (३२%) याबाबत चिंता आहे.

---

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

सर्दियों का मौसम शुरू होने वाला है, और इस मौसम में एक सवाल जो अक्सर लोगों के मन में आता है, वह यह है कि ठंड आते ही सांप कहाँ गायब हो जाते हैं? बरसात और गर्मियों में सांपों की गतिविधियाँ घरों के आसपास, खेतों में, और जंगलों में बढ़ जाती हैं, लेकिन सर्दियों में वे नजर क्यों नहीं आते? आइए, इस रहस्य को समझते हैं और सांपों के व्यवहार, उनकी जीवनशैली, और ठंड में उनकी गतिविधियों के बारे में विस्तार से जानते हैं।

**सांपों का सामान्य व्यवहार**

सांप ठंडे खून वाले जीव (Cold-Blooded) होते हैं, जिन्हें वैज्ञानिक भाषा में एक्टोथर्मिक (Ectothermic) कहा जाता है। इसका मतलब है कि वे अपने शरीर का तापमान पर्यावरण के अनुसार नियंत्रित करते हैं। सामान्य दिनों में सांप दिन का अधिकांश समय आराम करने में बिताते हैं। औसतन, एक सांप २४ घंटों में १६ से १८ घंटे तक सोता या आराम करता है। वे दिन में कुछ समय शिकार करने, भोजन की तलाश में, या अपने क्षेत्र की रक्षा करने में सक्रिय रहते हैं। लेकिन जैसे ही मौसम बदलता है, खासकर सर्दियों में, उनका व्यवहार पूरी तरह बदल जाता है।

**बरसात में सांपों की गतिविधियाँ क्यों बढ़ जाती हैं?**

बरसात का मौसम सांपों के लिए सबसे अनुकूल होता है। इस दौरान नमी बढ़ने और तापमान के संतुलित होने से सांपों की शारीरिक गतिविधियाँ तेज हो जाती हैं। बारिश के कारण उनके शिकार, जैसे मेंढक, चूहे, और छोटे कीड़े, अधिक सक्रिय हो जाते हैं, जिससे सांपों को भोजन आसानी से मिलता है। इसके अलावा, बरसात में बिलों और छिपने की जगहों में पानी भर जाने के कारण सांप खुले में निकल आते हैं, जिससे वे घरों, खेतों, और सड़कों पर अधिक दिखाई देते हैं।

**सावधानियाँ और सुझाव**

सर्दियों में भले ही सांप कम दिखें, लेकिन अगर आप जंगल, खेत, या पुराने घरों में जाते हैं, तो सावधानी बरतें। बरसात में सांपों से बचने के लिए:
घर के आसपास सफाई रखें और कचरे को हटाएँ।
रात में बाहर निकलते समय टॉर्च का उपयोग करें।
सांप दिखे तो उसे छेड़ें नहीं और तुरंत विशेषज्ञों को बुलाएँ।
सांपों का ठंड में गायब होना उनकी शीतनिद्रा की प्राकृतिक प्रक्रिया का हिस्सा है। तापमान के आधार पर उनका व्यवहार बदलता है, और सर्दियों में वे ऊर्जा बचाने के लिए निष्क्रिय हो जाते हैं। वहीं, बरसात में अनुकूल परिस्थितियों के कारण उनकी सक्रियता बढ़ जाती है। सांपों की इस अनोखी जीवनशैली को समझकर हम न केवल उनके बारे में जान सकते हैं, बल्कि उनके साथ सुरक्षित सह-अस्तित्व भी बना सकते हैं।

### सांपों की प्रजातियाँ और ठंड में उनका व्यवहार

भारत में कई प्रकार के सांप पाए जाते हैं, जैसे कोबरा, करैत, रसेल वाइपर, और अजगर। इनमें से कुछ जहरीले होते हैं, तो कुछ गैर-जहरीले। ठंड के मौसम में जहरीले सांप, जैसे कोबरा और करैत, गहरे बिलों या गर्म स्थानों में शीतनिद्रा में चले जाते हैं। वहीं, अजगर जैसे बड़े सांप कई दिनों तक एक ही जगह पर बिना हिले-डुले रह सकते हैं। कुछ सांप समूह में हाइबरनेशन करते हैं, जिसे हाइबरनैकुलम कहा जाता है, जहाँ कई सांप एक साथ एक गर्म स्थान पर इकट्ठा होते हैं।



### सर्दियों में सांप क्यों गायब हो जाते हैं?

सर्दियों में तापमान गिरने पर सांपों का शरीर सुस्त हो जाता है, क्योंकि उनकी शारीरिक प्रक्रियाएँ (जैसे पाचन, चयापचय, और गतिविधियाँ) पर्यावरण के तापमान पर निर्भर करती हैं। जब तापमान १५ डिग्री सेल्सियस से नीचे जाता है, तो सांपों के लिए सक्रिय रहना मुश्किल हो जाता है। इस दौरान वे हाइबरनेशन (शीतनिद्रा) की अवस्था में चले जाते हैं। हाइबरनेशन एक ऐसी प्रक्रिया है, जिसमें सांप अपनी ऊर्जा बचाने के लिए लंबे समय तक निष्क्रिय रहते हैं। इस दौरान वे बिलों, पेड़ों की खोह, चट्टानों की दरारों, या अन्य गर्म और सुरक्षित स्थानों में छिप जाते हैं। सर्दियों में सांप २० से २२ घंटे तक सो सकते हैं, और कुछ प्रजातियाँ, जैसे अजगर, कई दिनों तक बिना हिलने-डुलने आराम करती हैं। इस दौरान उनकी चयापचय दर (Metabolic Rate) बहुत कम हो जाती है, जिससे वे बिना भोजन के कई महीनों तक जीवित रह सकते हैं। कुछ सांप सर्दियों में पूरी तरह निष्क्रिय हो जाते हैं, जबकि कुछ प्रजातियाँ हल्की गर्मी मिलने पर थोड़े समय के लिए सक्रिय हो सकती हैं।

### सांपों के बारे में रोचक तथ्य

लंबी नींद : सांप सामान्य दिनों में भी १६-१८ घंटे आराम करते हैं, लेकिन सर्दियों में यह समय बढ़कर २०-२२ घंटे हो सकता है। शीतनिद्राः सर्दियों में सांप अपने शरीर की ऊर्जा बचाने के लिए शीतनिद्रा में चले जाते हैं और कई महीनों तक बिना भोजन के जीवित रहते हैं। बरसात में सक्रियताः बरसात में सांपों की प्रजनन अवधि भी होती है, जिसके कारण उनकी गतिविधियाँ और बढ़ जाती हैं। तापमान का प्रभावः सांपों का व्यवहार पूरी तरह तापमान पर निर्भर करता है। गर्मी में वे अधिक सक्रिय और ठंड में निष्क्रिय हो जाते हैं।छिपने की कलाः सांप बिलों, पेड़ों की खोह, और चट्टानों की दरारों में छिपने में माहिर होते हैं, जिसके कारण ठंड में उन्हें ढूंढना मुश्किल होता है।

---

## मंगळावरील जीवन : मानवी जिज्ञासेला नवे पंख!



**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

मंगळाच्या लाल धुळीच्या पृष्ठभागावर 'पर्सिव्हरन्स' रोव्हरने गोळा केलेले मौल्यवान नमुने साक्ष देत आहेत. नासाने २०२१ मध्ये पाठविलेल्या या रोव्हरचे प्रमुख उद्दिष्ट आहे. मंगळावर जीवनाचे चिन्ह शोधणे. हे नमुने एक दिवस पृथ्वीवर परत येतील आणि कदाचित मानवजातीच्या सर्वांत जुन्या प्रश्नाचे उत्तर मिळेल.

**आपण विश्वात एकटे आहोत का?**

यंदा सप्टेंबरमध्ये नासाने महत्त्वपूर्ण घोषणा केली. पर्सिव्हरन्सला मंगळावरील एका खडकात 'संभाव्य जैवस्वाक्षरी' (potential biosignature) सापडली. ही स्वाक्षरी जीवनाचा ठोस पुरावा नाही. ती उत्सुकतेला नवे पंख देणारी आहे. आज मंगळ कोरडा आणि थंड ग्रह वाटतो. परंतु अब्जावधी वर्षांपूर्वी त्याच्यावर दाट वातावरण आणि पाण्याचे साठे होते. जीवनासाठी अनुकूल परिस्थिती. त्यामुळे पर्सिव्हरन्स गेली चार वर्षे 'जेझेरो क्रेटर' या प्राचीन सरोवराच्या खळगीत शोध घेत आहे.

गेल्या वर्षी या खळगीत रोव्हरने ३.५ अब्ज वर्षे जुन्या खडकांचे रासायनिक विश्लेषण केले. त्यापैकी 'सॅफायर कॅनियन' नावाचा नमुना विशेष ठरला. जो 'चयावा फॉल्स' येथे सापडला. या खडकात माती व गाळाचे थर आणि चित्त्याच्या ठिपक्यांसारखी रचना आढळली. जी सूक्ष्मजीवांशी संबंधित रासायनिक क्रियांमुळे तयार झाली असावी, असा वैज्ञानिकांचा अंदाज आहे. या शोधाने उत्साह वाढला आहे. मात्र याची खात्री पृथ्वीवर नमुने आणल्यानंतरच होईल. मंगळावरील नमुने पृथ्वीवर आणणे हे खर्चिक आणि आव्हानात्मक कार्य आहे. नासा आणि युरोपियन स्पेस एजन्सी यासाठी 'मार्स सॅम्पल रिटर्न मिशन' राबवत आहेत. परंतु त्याचा कालावधी निश्चित नाही. दरम्यान, चीनने २०२८ मध्ये स्वतःची मोहीम राबवण्याची घोषणा केली आहे. मंगळावर जीवन होते का, हा प्रश्न केवळ वैज्ञानिक कुतूहलापुरता नाही. मंगळ हे मानवजातीच्या भविष्याचे प्रतीक आहे.

पृथ्वीवर हवामानबदल आणि संसाधनांचा तुटवडा वाढत असताना, मंगळ आपल्या विस्ताराच्या स्वप्नांचे कॅनव्हास बनले आहे. अंतराळ संशोधन आता जागतिक सहकार्यापेक्षा स्पर्धेचे क्षेत्र बनले आहे. मंगळाचे नमुने कोण आधी आणणार? पहिले पाऊल कोण ठेवणार? या प्रश्नांत राष्ट्र आणि कंपन्या स्पर्धेत उतरल्या आहेत. कृत्रिम बुद्धिमत्तेच्या युगात मंगळावरील प्रत्येक शोध आपली जिज्ञासा वाढवतो. हे खडक फक्त मंगळाविषयी नाहीत, तर ते मानवी शोधयात्रेचा पुरावा आहेत. मंगळावरील जीवनाचे ठसे सापडोत वा न सापडोत, हा शोध आपल्याला नवे प्रश्न विचारायला लावतो आणि मानवजातीच्या स्वप्नांना नवे पंख देतो!

---

**सक्सेस स्टोरी**

# सोलापूरचे जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद : यूपीएससीमध्ये ३५ वी रँक मिळविणारे यशस्वी प्रशासक

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

महाराष्ट्रातील सोलापूर जिल्ह्यातील महापुराच्या संकटकाळात जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी आपल्या कर्तबगार कारभाराने सर्वांचे लक्ष वेधून घेतले. मराठवाड्यातील लातूर, धाराशिव, बीड, जालना यासारख्या जिल्ह्यांप्रमाणे सोलापूरमध्येही पावसाने हाहाकार उडविला. मात्र, कुमार आशीर्वाद यांनी तेथील परिस्थिती हाताळण्यात यश मिळविले. या पार्श्वभूमीवर शिवसेना प्रवक्त्या ज्योती वाघमारे यांनी मदतकीट वितरणादरम्यान जिल्हाधिकाऱ्यांना फोन करून प्रश्न विचारण्याचा प्रयत्न केला. मात्र उलटपक्षी कुमार आशीर्वाद यांनीच त्यांना प्रशासकीय कामाची माहिती देऊन उत्तर दिले. या घटनेने कुमार आशीर्वाद यांच्या कर्तृत्वाची आणि धैर्याची चर्चा चांगलीच रंगली.

शिवसेना प्रवक्त्याला फोनवरूनच सुनावले

गेल्या आठवड्यात मराठवाड्यात मुसळधार पावसामुळे शेतीचे प्रचंड नुकसान झाले. अनेक गावांमध्ये पाणी शिरले. यामुळे पूरबाधितांना मदतीसाठी जिल्हा प्रशासन सतर्क झाले. अशातच शिवसेनेच्या (शिंदे गट) प्रवक्त्या वाघमारे पाकणी गावात मदतकीट घेऊन पोहोचल्या. तेथे ग्रामस्थांच्या तक्रारी ऐकून त्यांनी अपुरी मदत मिळत असल्याचा दावा करत थेट जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांना फोन केला. मात्र, कुमार आशीर्वाद यांनी शांतपणे उत्तर देत विचारले, की तुम्ही किती पूरबाधितांना भेटलात आणि त्यांना किती मदत दिली? यावर ज्योती वाघमारे यांचे बोलणेच थांबले. जिल्हाधिकाऱ्यांनी पुढे सांगितले, की प्रशासन सर्वांना मदत करत असून काम सुरू आहे. या घटनेने राजकीय दबावाला तोंड फोडणाऱ्या कुमार आशीर्वाद यांच्या भूमिकेची प्रशंसा झाली. सोलापूर जिल्ह्याच्या इतिहासात पहिल्यांदाच इतका मोठा महापुराचा सामना करावा लागला. त्यांनी संकट व्यवस्थापनात उत्कृष्ट कामगिरी बजावली.

कुमार आशीर्वाद यांची पार्श्वभूमी

कुमार आशीर्वाद हे मूळचे झारखंडचे आहेत. ३ ऑक्टोबर १९८८ रोजी एका साध्या कुटुंबात जन्मलेले कुमार आशीर्वाद यांचे बालपण आर्थिक तंगीमुळे संघर्षपूर्ण होते. हलाखीच्या परिस्थितीत कष्ट आणि जिद्दीच्या बळावर त्यांनी शिक्षण घेतले. शालेय शिक्षण दार्जिलिंग आणि जमशेदपूर येथून पूर्ण केले. त्यानंतर त्यांनी आयआयटी खरगपूरमधून इंजिनिअरिंगमध्ये बी.टेक पदवी मिळवली. बी.टेक नंतर कुमार आशीर्वाद यांनी यूपीएससीची तयारी सुरू केली. २०११ पासून अभ्यास करत असताना त्यांना चार वेळा अपयशाचा सामना करावा लागला. मात्र, हार मानण्याऐवजी त्यांनी मेहनत वाढविली आणि २०१६ मध्ये पाचव्या प्रयत्नात यश मिळविले.

यूपीएससी सिव्हिल सर्व्हिसेस परीक्षेत त्यांना देशात ३५ वी रँक मिळाली. ज्यामुळे ते भारतीय प्रशासकीय सेवेत (आयएएस) रुजू झाले. ही यशोगाथा सामान्य कुटुंबातील तरुणांना नक्कीच प्रेरणा देणारी आहे.

**महाराष्ट्रातील कारकीर्द :**

गडचिरोलीपासून सोलापूरपर्यंत महाराष्ट्रात नियुक्ती मिळाल्यानंतर कुमार आशीर्वाद यांचे पहिले पद गडचिरोली जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी (सीईओ) होते. तेथे त्यांनी ग्रामीण विकास आणि प्रशासकीय कामात उत्कृष्ट योगदान दिले. जुलै २०२३ पासून ते सोलापूरचे जिल्हाधिकारी म्हणून कार्यरत आहेत. गेल्या दोन वर्षांत सोलापूरमध्ये अनेक महत्त्वपूर्ण कार्यक्रमांचे यशस्वी आयोजन त्यांनी केले. जिल्ह्यातील पर्यटनवाढीसाठी विशेष प्रयत्न केले. जसे की पर्यटनस्थळांचा प्रचार आणि विकास योजना. तसेच युवकांना स्टार्टअप आणि उद्योजकतेकडे प्रोत्साहित करण्यासाठी सोलापूर विद्यापीठाच्या युवा महोत्सवात (ऑक्टोबर २०२४) ते बोलले आणि युवकांनी स्पर्धा परीक्षांबरोबरच स्टार्टअपवर लक्ष केंद्रित करावे, असे आवाहन केले.



हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक व मालक श्री. आनंद डिगंबर महाले यांनी महातेज पब्लिकेशनसाठी अविष्कार ग्राफिक्स, प्लॉट नं. 17, रामचंद्र नगर, भुसावळ रोड, जळगाव (महाराष्ट्र) 425002 येथे छापून गट नं. 160, प्लॉट नं. 51/52, सुप्रभा अपार्टमेंट, मराठा मंगल कार्यालयाजवळ, पटवारी कॉलनी, अमळनेर, जि. जळगाव (महाराष्ट्र) 425401 येथे प्रसिद्ध केले. संपादक :- आनंद डिगंबर महाले (रजि नं. MAHBIL/25/A0192), कार्यकारी संपादक श्री. भरत रघुनाथ पाटील ( पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील.) या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यातून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक व कार्यकारी संपादक सहमत असतीलच असे नाही. महातेज पब्लिकेशन तथा ग्लोबल महातेज संबंधित कोणतेही वाद तथा खटले फक्त अमळनेर न्यायालयातच चालविले जातील. संपर्क : 7011004040, 7011004242, ई-मेल : globalmahatej@gmail.com


# राजस्थान स्वीट मार्टचे अतिक्रमण काढण्याबाबतच्या राजेश पवारांच्या भावनिक आवाहनाला उदंड प्रतिसाद!

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर येथील पालिकेसमोर राजस्थान स्वीट मार्टचे अतिक्रमण काढावे, यासाठी सदर स्वीट मार्टच्या मागे ज्यांचा स्टुडिओ आहे, ते दीर्घकाळापासून पालिका, लोकप्रतिनिधी व उच्चपदस्थ अधिकाऱ्यांकडे सातत्याने लेखी स्वरूपात तक्रारी करीत आहेत. मात्र, त्यांच्या तक्रारीची अद्याप कोणीही दखल घेतलेली नाही. शुक्रवार, दि. १० ऑक्टोबर रोजी श्री. पवार यांनी त्यांची व्यथा ढसाढसा रडत ग्लोबल महातेजवळ व्यक्त केली. ग्लोबल महातेजने त्याबाबत सविस्तर व परखड वृत्त प्रसिद्ध केले आहे. या वृत्ताच्या कात्रणासह श्री. पवार यांनी विविध व्हॉट्सअॅप ग्रुप, मित्र परिवार व नातेवाईक तथा आप्तेष्टांना भावनिक आवाहन केले आहे. त्या आवाहनात त्यांनी नमूद केले आहे, की त्यांच्यावरील अन्यायाकडे लक्ष वेधण्यासाठी ते दिवाळीत रितसर परवानगी घेऊन थाळी बजाओ आंदोलन पालिकेत करणार आहेत. या आंदोलनात सहभागी होण्याचे त्यांनी आवाहन केले आहे. सदर आवाहनाला उदंड प्रतिसाद मिळत आहे. पालिकेच्या अन्यायकारक व संशयास्पद भुमिकेबाबत अनेकांनी अत्यंत परखड प्रतिक्रिया व्यक्त केल्या आहेत. 'अनेकांनी आम्ही येणारच', 'निषेधाच्या घोषणांनी पालिका प्रशासनाला जाग आणूच', 'भूमिपूत्रावरील हा अन्याय अमळनेरकर सहन करतातच कसा काय?', 'अमळनेर महाराष्ट्रात आहे, की युपी, बिहारमध्ये गेले', 'अमळनेरला कोणी वाली उरला आहे काय?' यासारख्या काही प्रतिक्रिया तर प्रसिद्धही करता येणार नाही इतक्या टोकाच्या शब्दात लोकांनी दिल्या आहेत. काही मूळ अमळनेरकर रहिवासी जे श्री. पवार यांच्यावर प्रेम करतात. तसेच या अन्यायाबाबत ज्यांना चिड निर्माण झाली आहे त्यांनी तर म्हटले आहे, की आम्ही दिवाळी सोडून मिळेल त्या वाहनांनी आंदोलनाला येऊच. विशेष म्हणजे त्यात काही सेवानिवृत्त उच्चपदस्थ अधिकाऱ्यांचाही समावेश आहे.

आता थेट भूमिपुत्रावरीलच अन्यायाचा मुद्दा अधोरेखित झाल्याने पालिका 'थैल्यांच्या' उबदार गोधडीत झोपते की थेट अमळनेरच्या मातीच्या अस्तित्वाचा प्रश्न निर्माण झाल्याने त्यांच्यातील अमळनेरकर रक्त जागे होते हे कळेलच.


राजस्थान स्वीट मार्टच्या 'स्वीट' मुळे पालिकेची अतिक्रमण कारवाईबाबत टाळाटाळ!
त्रस्त झालेले राजेश पवार ऐन दिवाळीत करणार धमाका
राजस्थान स्वीट मार्ट समोरील अतिक्रमण.


**श्री. राजेश पवार यांनी केलेले भावनिक आवाहन**

माझ्या सर्व सन्माननीय प्रिय मित्रांनो, सर्वांना नमस्कार,

मी कित्येक महिन्यांपासून राजस्थान स्वीट मार्टच्या तेलाच्या तळण्याचा व दुर्गंधीचा असह्य त्रास सहन करतो आहे. राजस्थान स्वीट मार्ट ने केलेले बेकायदेशीर अतिक्रमणामुळे माझ्या गरीबाचे पूर्णपणे दुकान झाकले गेले आहे. मी याबाबत नगरपालिकेकडे लोकप्रतिनिधींकडे व वरिष्ठांकडे अनेकदा तक्रारी केल्या आहेत. मात्र मी गरीब असल्याने माझ्यावर होत असलेल्या अन्याया बाबत कोणीच लक्ष दिले नाही. ही दुर्दैवाचे बाब आहे .माझ्या पिढ्यानपिढ्या अमळनेरच्या सेवा करीत आहेत. मी दिवाळीच्या काळात रीतसर परवानगी घेऊन थाली बजाव आंदोलन करणार आहे. या आंदोलनात कृपया आपण माझ्यासोबत सर्वांनी थाळ्या व चमचे घेऊन नगरपालिकेत उपस्थित राहावे. मी आपल्याला आंदोलनाची तारीख व वेळ लवकरच कळवतो आहे. जोपर्यंत नगरपालिकेला जाग येत नाही आणि नगरपालिकेतले अधिकारी व कर्मचारी जाऊन राजस्थान स्वीट मार्टचे अतिक्रमण काढत नाही तोपर्यंत आपल्याला नगरपालिकेच्या ग्राउंड मध्ये थाली बजाव आंदोलन करायचे आहे. माझे खूप मानसिक स्वास्थ्य खराब आहे .मला काय करावे काही समजत नाही. मला कोणी सहारा नाही. मी अनेकांकडे हात जोडून पाया पडून आलो आहे. मात्र मला कोणीच मदत करत नाही .कृपया आपण मला मदत करावी. माझ्यासोबत आंदोलनाला यावे ही नम्र विनंती.

आपला गरीब मित्र : रॉकी पवार

# माहितीचा अधिकार कायदा कलम चारच्या माहिती प्रसिद्धीला २० वर्षांपासून विलंब!

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : १२ ऑक्टोंबर २००५ रोजी केंद्राचा माहितीचा अधिकार अधिनियम २००५ लागू झाला. त्याला रविवार, दि. १२ ऑक्टोबर रोजी वीस वर्ष पूर्ण होत आहेत. हा अधिनियम अधिनियमित झाल्यापासून १२० दिवसाच्या आत कलमचे ४ (१) (ख) १ ते १७ मुद्दे स्वयंप्रेरणेने दरवर्षी अद्ययावत प्रसिद्ध करणे ही प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणाची जबाबदारी होती. कलम ४ ची अंमलबजावणी करावी यासाठी महाराष्ट्र शासनाने आतापर्यंत १३ परिपत्रके काढली. जिल्हाधिकाऱ्यांना नोडल अधिकारी म्हणून जबाबदारी दिली. मात्र, प्रशासनाने या बाबीकडे अक्षम्य दुर्लक्ष केले. जळगाव जिल्ह्यात कलम ४ ची अद्यावत माहिती कोणत्याही कार्यालयाने २० वर्षात जाहीर केली नाही. शासन आदेशाला केराची टोपली दाखवली आहे. हे माहिती अधिकार कायद्याचे अपयश आहे. याबाबत नुकतेच जळगाव जिल्ह्यात कार्यक्रमाला माहिती आयुक्त खंडपीठ (नाशिक) हे आले होते. मात्र, त्यांनी माहिती अधिकार कलम ४ची अंमलबजावणी विषयी कोणतीही प्रतिक्रिया दिली नाही, अशी माहिती माहिती अधिकाराचे मास्टर ट्रेनर प्रा. अशोक पवार यांनी एका प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकान्वये दिली आहे.

**कलम ४ मध्ये काय आहे?**

कार्यालयांची रचना, कार्य, कर्तव्य, अधिकारी, कर्मचाऱ्यांचे अधिकार व कर्तव्य, निर्णय घेण्याची पद्धत, कार्यालयीन कामे पार पाडण्यासाठीचे नियम, विनिमय, सूचना, नियम पुस्तिका आणि अभिलेख, धोरण तयार करण्याची व अंमलबजावणीची रीत, अधिकारी, कर्मचाऱ्यांची निर्देशिका, प्रत्येक अधिकारी व कर्मचाऱ्यांचे मासिक वेतनाची माहिती, नुकसान भरपाई देण्याची पद्धत, सर्व योजनांचा तपशील, त्यासाठी मिळालेले अनुदान, लाभा अधिकाऱ्यांचा तपशील, इत्यादी वरील स्वरूपाची माहिती प्रत्येक कार्यालयाने स्वयंप्रेरणेने दरवर्षी अद्यावत प्रसिद्ध करणे आवश्यक होते. मात्र, वीस वर्षात वरील प्रमाणे माहिती प्रसिद्ध न केल्यामुळे जनतेला माहिती मिळाली नाही. त्यामुळे माहिती अधिकार अर्जांची संख्या वाढली.

**माहिती अधिकार सप्ताह**

२८ सप्टेंबरहा आंतरराष्ट्रीय माहिती अधिकारदिन म्हणून साजरा केला जातो. ६ ऑक्टोबर ते १२ ऑक्टोबर हा आठवडा महाराष्ट्र सरकार माहिती अधिकार सप्ताह म्हणून साजरा करतात. यासंदर्भात महाराष्ट्र शासनाने परिपत्रकही काढले आहे. मात्र, तुरळक ठिकाणी कार्यक्रम होतात. माहिती अधिकाराचा समावेश माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षणाच्या अभ्यासक्रमात करावा. पारदर्शकता व उत्तरदायित्वासाठी हा कायदा खूप महत्त्वाचा आहे. या कायद्याच्या वापरामुळे भ्रष्टाचाराची अनेक मोठी प्रकरणे बाहेर आली. मात्र, अजूनही ९५ टक्के अर्जदार या कायद्याचा गैरवापर करतात. प्रामाणिकपणे माहिती मिळविण्यासाठी, त्या माहितीचा अभ्यास करण्यासाठी व सर्वसामान्य नागरिकाला माहिती पुरवण्यासाठी या कायद्याचा उपयोग होत नाही.


प्रा. अशोक पवार

**माहिती अधिकाराचे प्रशिक्षण बंद**

पुणे येथील यशदाच्या माध्यमातून महाराष्ट्रभर प्रशिक्षण कार्यक्रम राबविले गेले. मात्र, गेल्या ५ वर्षापासून प्रशिक्षण कार्यक्रम बंद झाले. या काळात अनेक अधिकारी, कर्मचारी सेवानिवृत्त झाले. नव्याने माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी म्हणून अनेकांना जबाबदारी मिळाली. मात्र, त्यांना प्रशिक्षणच नसल्याने या कायद्याच्या अंमलबजावणीमध्ये अडथळे येत आहेत. शासनाने माहिती अधिकाराचे प्रशिक्षण सुरू करावे अशी कर्मचाऱ्यांची मागणी आहे.

**माहिती आयुक्तांकडे अपील पडून**

माहिती आयुक्तांनी किती दिवसात दुसरे अपिलाचा निर्णय द्यावा याचे बंधन नसल्याने, आयोगाकडे शेकडो अपील पडून आहेत. किमान दोन वर्ष माहिती आयोगाचे अपिलाच्या निर्णयाची वाट पाहावी लागते. इतक्या उशिरा मिळालेल्या माहितीचा अनेक अपिलार्थींना उपयोग होत नाही. न्याय उशिरा मिळणे म्हणजे न्याय नाकारल्यासारखे आहे, याचा गांभीर्याने विचार करावा.

**अभिलेख व्यवस्थापनाकडे दुर्लक्ष**

माहिती अधिकार कायद्यात माहिती द्यावी असे आहे. मात्र, अभिलेख व्यवस्थापन व्यवस्थित नसल्याने माहिती सापडत नाही. यामुळे कर्मचारी त्रस्त आहेत. रिक्त पदे जास्त आहेत. असलेल्या कर्मचारी व अधिकाऱ्यांचे प्रशिक्षण नाही. परिणामी माहिती अधिकार अर्जावर काम करणे तारेवरची कसरत आहे. त्यामुळे माहिती नाकारण्याची मानसिकता निर्माण होते. माहिती अधिकार कायदा २१ व्या वर्षात पदार्पण करत असल्याने या बाबींचा गांभीर्याने विचार व्हावा अशी अपेक्षा आहे.







## अॅड. पाटील स्कूलच्या चाहत पाटीलची कॅरम स्पर्धेत विभाग स्तरावर निवड

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : येथील अॅड. ललिता पाटील इंटरनॅशनल स्कूलची विद्यार्थिनी चाहत अशोक पाटील हिने १७ वर्षे वयोगटातील जिल्हास्तरीय कॅरम स्पर्धेत विजेतेपद पटकावले आहे. विभाग स्तरावर होणाऱ्या कॅरम स्पर्धेसाठीही तीची निवड झाली आहे. ही स्पर्धा शुक्रवार, दि. १० ऑक्टोबर रोजी शासन क्रीडा विभाग व युवक कल्याण विभागातर्फे जळगाव येथे झाली होती. चाहतच्या विजयामुळे अॅड .ललिता पाटील इंटरनॅशनल स्कूलच्या शिरपेचात पुन्हा एकदा मानाचा तुरा रोवला गेला आहे. जिजाऊ बहुउद्देशीय संस्थेच्या अध्यक्षा अॅड .ललिता पाटील, प्राचार्य डॉ. नीरज चव्हाण यांनी चाहतचे अभिनंदन केले आहे. क्रीडा शिक्षक केदार देशमुख, सागर चावरिया, रमेश धनगर आणि श्रीमती ममता पाटील यांचे तीला मार्गदर्शन लाभले.

## कवठळ जि. प. शाळेतील शिक्षक सुरेश सोनवणे निलंबित

पान १ वरून

शाळेत अनुपस्थित असल्याचे आढळून आले. त्यानंतर गट शिक्षणाधिकारी, केंद्र प्रमुख (चांदसर) व केंद्र प्रमुख (पाळधी) यांनी गुरुवार दि. ९ ऑक्टोबर रोजी प्रत्यक्ष शाळेस भेट देऊन चौकशी केली. चौकशीदरम्यान ग्रामस्थ, पालक, व्यवस्थापन समितीचे पदाधिकारी व सहशिक्षकांनी श्री. सोनवणे हे वारंवार मद्यपान करून शाळेत येतात. वर्गात अध्यापन करत नाही आदी गंभीर तक्रारी केल्या. दरम्यान, या घटनेचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल होताच मुख्य कार्यकारी अधिकारी करणवाल यांनी कारवाईचे निर्देश दिले.







अनेकांना पत्रकार होण्याची सुप्त इच्छा असते. मात्र त्यासाठी काय करावे ? आपल्याला ते जमेल का ? आपल्याला लिहिता येईल का? सर्वच वृत्तपत्रांनी पुरेशा संख्येत त्यांचे अधिकृत प्रतिनिधी नेमले आहेत मग आपल्याला कोण संधी देईल?

ती संधी आम्ही आपणास उपलब्ध करून देत आहोत. खास करून आपल्या भागातील किंवा अमळनेर विधानसभा मतदारसंघातील कोणतीही समस्या, निधन वार्ता , विवाह वार्ता शक्यतो फोटोसह आम्हास लिहून कळवा. आपल्याला जसे लिहिता येईल तसे लिहा. त्यास आम्ही बातमीचे स्वरूप देऊ. त्याखाली वाचक पत्रकार म्हणून आपले नावही प्रसिद्ध करू. आपले नाव गोपनीय ठेवावे अशी आपली इच्छा असल्यास आपले नाव प्रसिद्ध केले जाणार नाही. बातमी चांगली असल्यास आपल्या फोटोसह प्रसिद्ध करू. आपणास लिहिण्याची इच्छा नसल्यास काही विषयांवर आम्हीच लिहावे, त्यास व्यापक प्रसिद्धी द्यावी असे आपणास वाटत असल्यास आम्हास आपण आपल्या मतदारसंघातील विषय ही सुचवू शकता. चला तर मग होऊया आपण पत्रकार. फोडू या समस्यांना वाचा. देऊयात चांगल्या कार्यांना प्रसिद्धी.

बातमीसाठी संपर्क :
रजनीकांत पाटील : 8788441234
योगेश महाजन : 9850576058
भरत पाटील : 9922408434

जाहिरातीसाठी संपर्क :
शरद कुलकर्णी: 9922547800
रजनीकांत पाटील : 8788441234




**जाहिरात दर**

| | | |
|---|---|---|
| १) | पूर्ण पान | 45,000/- रु. |
| २) | अर्ध पान | 25,000/- रु. |
| ३) | पाव पान (16 x 25 सें. मी.) | 13,000/- रु. |
| ४) | 16 x 13 सें. मी. | 7,000/- रु. |
| ५) | 12 x 10 सें. मी. | 4,000/- रु. |
| ६) | 8 x 10 सें. मी. | 2,500/- रु. |
| ६) | ३ वर्षाखालील बाळाचा वाढदिवस | 200/- रु. |
| ७) | शुभविवाह जाहिरात (वधू-वराच्या रंगीत फोटोसह ) | 300/- रु. |
| ८) | लिगल नोटीस | 150/- रु. |
| ९) | उठावणा जाहिरात | मोफत |

* फ्रंट पेज साठी जाहिरात २०% जादा दर असेल. * शेवटच्या पानासाठी १०% जादा दर असेल.

जाहिरात बुकिंगसाठी संपर्क
शरद कुलकर्णी : 99225 47800/95271 08678
रजनीकांत पाटील : 87884 41234

वरील सर्व दरांत नियमित जाहिरातदारांना विशेष सवलत मिळेल व बातम्यांच्या स्वरूपात मोठी प्रसिद्धी मिळेल.



# ॥ मंगल ॥ पान



**आध्यात्मिक यात्रा...**

सुपरस्टार रजनीकांत यांनी ५० वर्षांच्या यशस्वी कारकीर्दीनंतर चित्रपटसृष्टीपासून विश्रांती घेऊन नुकतीच आध्यात्मिक यात्रेला सुरूवात केली आहे. वयाच्या ७४ व्या वर्षी त्यांनी हा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. रजनीकांत एका छायाचित्रात रस्त्यावर जेवताना दिसत आहेत.

# ऋषियों की संख्या सात ही क्यों?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

हर काल में अलग-अलग सप्तर्षि रहे है। जानिए कौन किस काल के है। आकाश में ७ तारों का एक मंडल नजर आता है। उन्हें सप्तर्षियों का मंडल कहा जाता है। इसके अतिरिक्त सप्तर्षि से उन ७ तारों का बोध होता है, जो ध्रुव तारे की परिक्रमा करते हैं। उक्त मंडल के तारों के नाम भारत के महान ७ संतों के आधार पर ही रखे गए हैं। वेदों में उक्त मंडल की स्थिति, गति, दूरी और विस्तार की विस्तृत चर्चा मिलती है।

### ऋषियों की संख्या सात ही क्यों?

।।सप्त ब्रह्मर्षि, देवर्षि, महर्षि, परमर्षय : कण्डर्षिश्च, श्रुतर्षिश्च, राजर्षिश्च क्रमावश।। **अर्थात :** १) ब्रह्मर्षि, २) देवर्षि, ३) महर्षि, ४) परमर्षि, ५) काण्डर्षि, ६) श्रुतर्षि और ७) राजर्षि ये ७ प्रकार के ऋषि होते हैं इसलिए इन्हें सप्तर्षि कहते हैं। भारतीय ऋषियों और मुनियों ने ही इस धरती पर धर्म, समाज, नगर, ज्ञान, विज्ञान, खगोल, ज्योतिष, वास्तु, योग आदि ज्ञान का प्रचार-प्रसार किया था। दुनिया के सभी धर्म और विज्ञान के हर क्षेत्र को भारतीय ऋषियों का ऋणी होना चाहिए। उनके योगदान को याद किया जाना चाहिए। उन्होंने मानव मात्र के लिए ही नहीं, बल्कि पशु-पक्षी, समुद्र, नदी, पहाड़ और वृक्षों सभी के बारे में सोचा और सभी के सुरक्षित जीवन के लिए कार्य किया। आओ, संक्षिप्त में जानते हैं कि किस काल में कौन से ऋषि थे।

भारत में ऋषियों और गुरु-शिष्य की लंबी परंपरा रही है। ब्रह्मा के पुत्र भी ऋषि थे तो भगवान शिव के शिष्यगण भी ऋषि ही थे। प्रथम मनु स्वायंभुव मनु से लेकर दीर्घकाल तक ऋषि परंपरा के बारे में जानकारी मिलती है। हिन्दू पुराणों ने काल को मन्वंतरों में विभाजित कर प्रत्येक मन्वंतर में हुए ऋषियों के ज्ञान और उनके योगदान को परिभाषित किया है। प्रत्येक मन्वंतर में प्रमुख रूप से ७ प्रमुख ऋषि हुए हैं। विष्णु पुराण के अनुसार

### इनकी नामावली इस प्रकार है-


१) प्रथम स्वायंभुव मन्वंतर में- मरीचि, अत्रि, अंगिरा, पुलस्त्य, पुलह, क्रतु और वशिष्ठ।
२) द्वितीय स्वारोचिष मन्वंतर में- ऊर्ज्ज, स्तम्भ, वात, प्राण, पृषभ, निरय और परीवान।
३) तृतीय उत्तम मन्वंतर में- महर्षि वशिष्ठ के सातों पुत्र।
४) चतुर्थ तामस मन्वंतर में- ज्योतिर्धामा, पृथु, काव्य, चैत्र, अग्नि, वनक और पीवर।
५) पंचम रैवत मन्वंतर में- हिरण्यरोमा, वेदश्री, ऊर्ध्वबाहु, वेदबाहु, सुधामा, पर्जन्य और महामुनि।
६) षष्ठ चाक्षुष मन्वंतर में सुमेधा, विरजा, हविष्मान, उतम, मधु, अतिनामा और सहिष्णु।
७) वर्तमान सप्तम वैवस्वत मन्वंतर में- कश्यप, अत्रि, वशिष्ठ, विश्वामित्र, गौतम, जमदग्नि और भारद्वाज।

### भविष्य में

१) अष्टम सावर्णिक मन्वंतर में- गालव, दीप्तिमान, परशुराम, अश्वत्थामा, कृप, ऋष्यशृंग और व्यास।
२) नवम दक्षसावर्णि मन्वंतर में- मेधातिथि, वसु, सत्य, ज्योतिष्मान, द्युतिमान, सबन और भव्य।
३) दशम ब्रह्मसावर्णि मन्वंतर में- तपोमूर्ति, हविष्मान, सुकृत, सत्य, नाभाग, अप्रतिमौजा और सत्यकेतु।
४) एकादश धर्मसावर्णि मन्वंतर में- वपुष्मान, घृणि, आरुणि, नि:स्वर, हविष्मान, अनघ और अग्नितेजा।
५) द्वादश रुद्रसावर्णि मन्वंतर में- तपोद्युति, तपस्वी, सुतपा, तपोमूर्ति, तपोनिधि, तपोरति और तपोधृति।
६) त्रयोदश देवसावर्णि मन्वंतर में- धृतिमान, अव्यय, तत्वदर्शी, निरुत्सुक, निर्मोह, सुतपा और निष्प्रकम्प।
७) चतुर्दश इन्द्रसावर्णि मन्वंतर में- अग्नीध्र, अग्नि, बाहु, शुचि, युक्त, मागध, शुक्र और अजित। इन ऋषियों में से कुछ कल्पान्त-चिरंजीवी, मुक्तात्मा और दिव्यदेहधारी हैं।

### शतपथ ब्राह्मण के अनुसार

१) गौतम, २) भारद्वाज, ३) विश्वामित्र, ४) जमदग्नि, ५) वसिष्ठ, ६) कश्यप और ७) अत्रि।



### महाभारत के नुसार

१) मरीचि, २) अत्रि, ३) अंगिरा, ४) पुलह, ५) क्रतु, ६) पुलस्त्य और ७) वसिष्ठ सप्तर्षि माने गए हैं।

महाभारत में राजधर्म और धर्म के प्राचीन आचार्यों के नाम इस प्रकार हैं बृहस्पति, विशालाक्ष (शिव), शुक्र, सहस्राक्ष, महेन्द्र, प्राचेतस मनु, भरद्वाज और गौरशिरस मुनि। कौटिल्य के अर्थशास्त्र में इनकी सूची इस प्रकार है- मनु, बृहस्पति, उशनस (शुक्र), भरद्वाज, विशालाक्ष (शिव), पराशर, पिशुन, कौणपदंत, वातव्याधि और बहुदंती पुत्र। वैवस्वत मन्वंतर में वशिष्ठ ऋषि हुए। उस मन्वंतर में उन्हें ब्रह्मर्षि की उपाधि मिली। वशिष्ठजी ने गृहस्थाश्रम की पालना करते हुए ब्रह्माजी के मार्गदर्शन में उन्होंने सृष्टि वर्धन, रक्षा, यज्ञ आदि से संसार को दिशाबोध दिया।

# रावणपुत्र इंद्रजित कोणत्या देवीची उपासना करायचा?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

रावणाचा पराक्रमी पुत्र इंद्रजित हा अतिशय शक्तिशाली योद्धा होता. देवतांनाही त्याची भीती वाटत असे. यामागील रहस्य त्याच्या तांत्रिक विद्या आणि एका विशिष्ट देवीच्या उपासनेत दडले होते. इंद्रजित नेमकी कोणत्या देवीची उपासना करायचा? चला, ते जाणून घेऊया...

**इंद्रजित आणि माता प्रत्यंगिरा**

इंद्रजित ज्याला ' मेघनाद ' म्हणूनही ओळखले जाते. हा रावणाचा सर्वांत शूर आणि बुद्धिमान पुत्र होता. त्याने माता ' प्रत्यंगिरा ' या शक्तिशाली देवीची उपासना केली होती. या उपासनेमुळे त्याला अपार तांत्रिक आणि युद्धकौशल्य प्राप्त झाले. माता प्रत्यंगिरा यांचे स्वरूप अर्धसिंहिणी आणि अर्धनारी असे आहे. जे संहार आणि संतुलनाचे प्रतीक आहे. पौराणिक कथांनुसार प्रत्यंगिरा देवीचा अवतार भगवान शिव आणि विष्णूंमधील संघर्ष थांबविण्यासाठी झाला होता.

शिव-विष्णू संघर्ष आणि प्रत्यंगिरा अवतार

पौराणिक कथेनुसार भगवान विष्णू यांनी हिरण्यकशिपूचा वध करण्यासाठी नरसिंह अवतार घेतला. मात्र वधानंतरही नरसिंहाचा रोष शांत झाला नाही. ज्यामुळे सृष्टीचे संतुलन धोक्यात आले. यावर उपाय म्हणून भगवान शिव यांनी शरभेश्वर नावाचे उग्र रूप धारण केले. त्यामुळे शिव आणि विष्णू यांच्यात संघर्ष निर्माण झाला. ब्रह्मांड अस्थिर होऊ लागले. देव-देवता भयभीत झाले. तेव्हा आदिशक्तीने माता प्रत्यंगिरा या रूपात अवतार घेतला. तिच्या प्रचंड गर्जनेने भगवान शिव आणि विष्णू शांत झाले. सृष्टीचे संतुलन राखले गेले.

माता प्रत्यंगिरा या संहारक आणि शांतीदायी शक्तीच्या प्रतीक आहेत. इंद्रजितने याच देवीच्या साधनेतून तांत्रिक शक्ती आणि युद्धकौशल्य मिळविले. रामायणात त्याने या सामर्थ्याने लक्ष्मणाला गंभीर जखमी केले. त्यास मृत्यूच्या दारात आणले. त्याच्या ब्रह्मास्त्र आणि नागपाश यांसारख्या शक्तिशाली अस्त्रांमुळे तो रणांगणावर अजिंक्य मानला जात होता.

**इंद्रजितचा पराक्रम**

इंद्रजित इतका पराक्रमी होता, की त्याने देवराज इंद्राचाही पराभव केला होता. त्यामुळे त्याला ' इंद्रजित ' हे नाव मिळाले. त्याच्या तांत्रिक शक्ती आणि माता प्रत्यंगिरेच्या कृपेमुळे तो युद्धात अजेय होता. मात्र, अखेर लक्ष्मणाने श्री हनुमान आणि सुग्रीव यांच्या मदतीने त्याचा पराभव केल्याने रावणाच्या पराभवाचा मार्ग मोकळा झाला. इंद्रजितच्या पराक्रमामागे माता प्रत्यंगिरेची उपासना हे प्रमुख कारण होते. या देवीच्या शक्तीने तो इतका बलशाली बनला, की देवतांनाही त्याची भीती वाटायची. रामायणातील हा प्रसंग म्हणजे वाईटावर चांगल्याच्या विजयाचे प्रतीक आहे. ज्याची आठवण दरवर्षी दसऱ्याला रावण दहनाद्वारे केली जाते.



## महादेवांना बेलाचे पान का अर्पण करतात?

विविध ग्रंथांमध्ये महादेवांना बेलाचे पान अर्पण करण्याचे विशेष महत्त्व सांगण्यात आले आहे. तीन पान असलेले एक बिल्वपत्राचा लाईफ मॅनेजमेंट दृष्टिकोनातून विचार केल्यास बिल्वपत्राची तीन पाने चार पुरुषार्थामध्ये तिघांचे प्रतीक आहे - धर्म, अर्थ व काम. हे तिन्ही निस्वार्थ भावनेने महादेवांना समर्पित करणाऱ्या व्यक्तीला चौथा पुरुषार्थ म्हणजे मोक्ष प्राप्त होतो.



# महादेवांशी संबंधित रहस्यांची उत्तरे





## भांग, धोत्रा का अर्पण करतात?

धार्मिक मान्यतेनुसार महादेवाला भांगप्रेमी सांगण्यात आले आहे. शिवचरित्रामध्ये विविध रोचक गोष्टी सांगण्यात आल्या आहेत. परंतु त्यामध्ये सामावलेल्या असाधारण संदेशांमुळेच महादेव पूजनीय आहेत. यामध्ये विशेषतः विषपान, बिल्वपत्र, धोत्रा यासारख्या कडवट सामग्री प्रिय असणे यामागे एक शिकवण आहे. वास्तविकतेमध्ये सुखासाठी शक्ती संपन्न होण्यासोबतच परोपकार, त्याग आणि संयम या गोष्टींद्वारे वाईट सवयी किंवा परिस्थिती स्वरूपातील कडवटपणा गोडव्यामध्ये बदलण्याची शिकवण आहे. याच कारणामुळे शिवलिंगावर भांग, धोत्रा आणि रूटीचे फुल यासारख्या विषारी गोष्टी विशेष मंत्राचा उच्चार करून अर्पण करणे शुभ मानले गेले आहे. या विशेष मंत्राच्या स्मरणाने अपयश स्वरूपातील दुःख समाप्त होऊन सुख आणि यश प्राप्त होईल.

## महादेव गळ्यात साप धारण का करतात?

महादेव जेवढे रहस्यमयी आहेत तेवढेच त्यांचे वस्त्र आणि आभूषण विचित्र आहेत. संसारिक लोक या गोष्टींपासून दूरच राहतात. महादेव त्याच गोष्टी स्वतःजवळ बाळगतात. भगवान शिव एकमेव असे देवता आहेत, की जे गळ्यात साप धारण करतात. वास्तवात साप एक धोकादायक प्राणी आहे. परंतु तो कोणालाही विनाकारण दंश करत नाही. साप परिस्थितिक तंत्राचा महत्त्वपूर्ण जीव आहे. लाईफ मॅनेजमेंट दृष्टिकोनातून पाहिल्यास महादेव गळ्यामध्ये साप धारण करून असा संदेश देतात, की जीवनचक्रात प्रत्येक प्राण्याचे विशेष योगदान आहे. यामुळे कधीही हिंसा करू नये.

## महादेवाला का प्यावे लागले विष?

समुद्र मंथनातून निघालेले विष भगवान शिव यांनी आपल्या कंठात धारण केले. विषाच्या प्रभावाने त्यांचा कंठ निळा झाला. ते निळकंठ नावाने प्रसिद्ध झाले. समुद्र मंथनाचा अर्थ आहे विचारांचे मंथन. मनामध्ये असंख्य विचार आणि भावना असतात. त्यांचे मंथन करून चागले विचार आचरणात आणावेत. आपण जेव्हा आपल्या मनाचे मंथन करू तेव्हा सर्वांत पहिले वाईट विचार बाहेर पडतील. हेच विष असून हे वाईटाचे प्रतीक आहे. महादेवाने हे आपल्या कंठात धारण केले. त्याचा प्रभाव शरीरावर होऊ दिला नाही. महादेवाचे विषप्राशन आपल्याला असा संदेश देतो, की वाईट गोष्टींचा प्रभाव आपल्यावर न होऊ देणे. वाईट गोष्टींपासून नेहमी दूर राहावे'.

## महादेवाच्या मस्तकावर चंद्र का आहे?

महादेव भालचंद्र नावानेसुद्धा प्रसिद्ध आहेत. भालचंद्रचा अर्थ मस्तकावर चंद्र धारण करणारा. चंद्राचा स्वभाव शीतल असतो. चंद्राच्या प्रकाश शीतलता प्रदान करतो. लाईफ मॅनेजमेंट दृष्टिकोनातून महादेव आपल्याला असा संदेश देतात, की आयुष्यात कितीही मोठे संकट आले, तरी मन, बुद्धी शांत ठेवून कार्य करावे. बुद्धी शांत असल्यास कोणत्याही समस्येतून सहजपणे मार्ग काढला जाऊ शकतो.

## महादेवांचे वाहन नंदी का आहे?

महादेवांचे वाहन नंदी आहे. बैल अत्यंत कष्टाळू प्राणी आहे. हा प्राणी शक्तिशाली असूनही अत्यंत शांत आणि भोळा आहे. महादेवसुद्धा परमयोगी, शक्तिशाली आणि परम शांत स्वभावाचे तसेच एवढे भोळे आहेत, की यांचे नाव भोलेनाथ सर्व जगात प्रसिद्ध आहे. महादेवांनी ज्याप्रकारे कामदेवाला भस्म करून त्यावर विजय प्राप्त केला होता त्याचप्रमाणे त्यांचे वाहनसुद्धा कमी नाही. त्याचे काम वासनेवर पूर्ण नियंत्रण राहते. या व्यतिरिक्त नंदीला पुरुषार्थाचे प्रतीक मानले जाते. खूप कष्ट करूनही बैल कधीही थकत नाही. हा प्राणी सतत आपले कर्म करत राहतो. याचा अर्थ आपणही सदैव आपले कर्म करत राहावे. कर्म करत राहिल्यामुळे ज्याप्रमाणे नंदी महादेवांना प्रिय आहे त्याचप्रकारे आपणही महादेवांची कृपा प्राप्त करू शकतो.



## महादेवांना तीन डोळे का आहेत?

धर्मग्रंथानुसार सर्व देवतांना दोन डोळे आहेत. परंतु महादेवांना तीन डोळे आहेत. तीन डोळे असल्यामुळे त्यांना त्रिनेत्रधारी असेही म्हणतात. लाईफ मॅनेजमेंट दृष्टिकोनातून पाहिल्यास महादेवाचा तिसरा डोळा प्रतिकात्मक आहे. डोळ्यांचे काम आहे मार्ग दाखविणे आणि रस्त्यामध्ये येणाऱ्या अडचणींपासून सावध करणे. आयुष्यात विविध संकटे येत राहतात, जे आपण लवकर ओळखू शकत नाहीत. अशावेळी विवेक आणि धैर्य एका उत्तम मार्गदर्शकाप्रमाणे आपल्याला योग्य-अयोग्य गोष्टीमधील फरक सांगतात. हा विवेक प्रेरणारूपात आपल्यामध्ये असतो. फक्त तो जागृत करण्याची आवश्यकता आहे '.

## महादेव संपूर्ण शरीरावर भस्म का लावतात?

आपल्या धर्मशास्त्रात सर्व देवी-देवतांना अलंकार, वस्त्र, दागिने यांनी सुसज्ज असे दाखविले गेलेले आहेत. महादेव फक्त मृगचर्म (हरणाचे कातडे) गुंडाळलेले आणि भस्म लावलेले असतात. भस्म महादेवांचे प्रमुख वस्त्र आहे. कारण महादेवांचे संपूर्ण शरीर भस्माने झाकलेले असते. संतांचे सुद्धा भस्म हेच एकमात्र वस्त्र आहे. अघोरी, संन्यासी आणि इतर साधू आपल्या शरीरावर भस्म लावून फिरतात. महादेवाच्या भस्म लावण्यामागे वैज्ञानिक तसेच अध्यात्मिक कारण आहे. भस्माचा एक विशेष गुण आहे. भस्म शरीरातील रोमांचित करणा-या छिद्रांना बंद करते. भस्म शरीरावर लावल्याने गरमीमध्ये गरमी आणि थंडीमध्ये थंडी जाणवत नाही. भस्म त्वचासंबंधी रोगांमध्ये औषधाचे काम करते. भस्म धारण करणारे महादेव हा संदेश देतात, की परिस्थितीनुसार स्वतःला बदलणे हा मनुष्याचा सर्वात मोठा गुण आहे.) शिवलिंगावर भस्म लावलेले असतात. भस्म महादेवांचे प्रमुख वस्त्र आहे. कारण महादेवाचे संपूर्ण शरीर भस्माने झाकलेले असते. संतांचे सुद्धा भस्म हेच एकमात्र वस्त्र आहे. अघोरी, संन्यासी आणि इतर साधू आपल्या शरीरावर भस्म लावून फिरतात. महादेवांच्या भस्म लावण्यामागे वैज्ञानिक तसेच अध्यात्मिक कारण आहे. भस्माचा एक विशेष गुण आहे. भस्म शरीरातील रोमांचित करणा-या छिद्रांना बंद करते. भस्म शरीरावर लावल्याने गरमीमध्ये गरमी आणि थंडीमध्ये थंडी जाणवत नाही. भस्म त्वचासंबंधी रोगांमध्ये औषधाचे काम करते. भस्म धारण करणारे महादेव हा संदेश देतात, की परिस्थितीनुसार स्वतःला बदलणे हा मनुष्याचा सर्वात मोठा गुण आहे.)

## महादेवांच्या हातामध्ये त्रिशूळ का आहे?

त्रिशूळ हे भगवान शिव यांचे प्रमुख अस्त्र आहे. त्रिशूळाकडे पाहा... तीन तीक्ष्ण टोक दिसतात. तसे पाहिले तर हे अस्त्र संहाराचे प्रतीक आहे. परंतु वास्तवात त्रिशूळामागे फार मोठा गूढ अर्थ दडलेला आहे. या जगात तीन प्रकारच्या प्रवृत्ती आहेत... सत, रज आणि तम. सत म्हणजे सत्यगुण, रज म्हणजे सांसारिक आणि तम म्हणजे तामसी अर्थात निशाचरी प्रवृत्ती. प्रत्येक माणसात या तिन्ही प्रवृत्ती आढळून येतात. फक्त या प्रवृत्तींचे प्रमाण प्रत्येकात वेगवेगळे असते. त्रिशूळातील तीन टोक या तीन प्रवृत्तींचे प्रतिनिधीत्व करतात. भगवान शिव आपल्याला संदेश देतात, की या तिन्ही गुणांवर आपले नियंत्रण आहे. हा त्रिशूळ तेव्हाच उचला जेव्हा कठीण परिस्थिती असेल. तेव्हा या तिन्ही गुणांचा आवश्यकतेनुसार वापर करा.

## भूत-प्रेत महादेवांचे गण का आहेत?

महादेवांना संहाराचे देवता मानण्यात आले आहे. जेव्हा मनुष्य आपल्या सर्व मर्यादा तोडू लागतो तेव्हा महादेव त्याचा संहार करतात. ज्या लोकांना आपल्या पापकर्मांचे फळ भोगावे लागते तेच प्रेतयोनी प्राप्त करतात. या सर्वांना महादेव दंडित करतात. कारण शिव संहार देवता आहेत. या कारणामुळे यांना भूत-प्रेतांचा देवता मानले जाते. वास्तवामध्ये जे भूत-प्रेत आहेत ते केवळ एक सूक्ष्म शरीराचे प्रतीक आहेत. महादेवाचा यामागे असा संदेश आहे, की प्रत्येक प्रकारचा जीव ज्याची सर्वजण घृणा करत किंवा त्याला घाबरतात तोसुद्धा महादेवांजवळ पोहोचू शकतो. अट केवळ एवढीच आहे, की त्याने स्वतःचे सर्वस्व महादेवाला समर्पित करावे.

## भगवान शिव यांना स्मशानाचे निवासी का मानले जाते?

महादेवाला संपूर्ण कुटुंब असलेले देवता मानले जाते. परंतु तरीही ते स्मशानात निवास करतात. भगवान शिव संसारिक असूनही ते स्मशानात निवास करतात. यामागे लाईफ मॅनेजमेंटचे एक गूढ सूत्र दडलेले आहे. हा संसार मोह-मायेचे प्रतीक आहे. स्मशान वैराग्याचे. महादेव सांगतात, की या संसारात राहून आपले कर्तव्य पूर्ण करावेत. परंतु मोहमायेपासून दूर राहावे. कारण हा संसार नश्वर आहे. कधी ना कधी हे सर्व नष्ट होणार आहे. यामुळे संसारात राहून कोणताही मोह न बाळगता आपले कर्तव्य पूर्ण करत वैरागीप्रमाणे आचरण करावे.